
# स्नेहवन वार्ता

एक आशेचा किरण

फेब्रुवारी २०२४

संपादन व मार्गदर्शन : नयना निर्गुण
संकलन व लेखन : श्रीकांत, वैभव, दीपक


स्नेहवन संस्था आत्महत्याग्रस्त शेतकरी, आई किंवा वडील नसलेल्या गरजू शेतकऱ्यांच्या मुला मुलींचे मोफत शिक्षण व संगोपन करते.

सोबत कम्प्युटर, संगीत, उद्योग, मल्लखांब ही शिकवले जाते.
ॲडमिशन सुरू झाले आहेत. गरजू मुलांनी संपर्क करा. शेअर करून सहकार्य करा.

या सुखांनों साद घालु
दु:खितांच्या जिवनी...
फुल नाही तर पाकळी होवू।
दु:खितांच्या जिवनी सुगंध देवू।।


वेबसाईट- www.snehwan.in | फेसबुक- www.facebook.com/snehwan | Instagram- www.instagram.com/ashok.snehwan | पत्ता : स्नेहवन, कोयाळी फाटा, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१


**जनमत**

## पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा..!

**समरेंद्र निंबाळकर,** मुंबई

तेरा गुंठे शेतजमीन आहे शिंदे कुटुंबाकडे. तीही सिंचनाची सोय नसलेल्या पट्ट्यात. त्यांचा तरुण मुलगा विशाल, त्याच्या बहिणी वैष्णवी व छाया आणि आई, असे कुटुंब. वडील होते तेव्हा त्यांच्यासह एकूण पाच लोक निर्वाह करू शकतील का या जमिनीच्या तुकड्यावर? अल्पभूधारक असणे, नापिकी, दुष्काळ सोसणे, वाट्यास कधी व्यसनाधीनता येणे, गारपीट,अवकाळी,कर्जयांनीभंडावूनजाणे,मुलींचीलग्न,मुलांचेशिक्षण(मुलींचे आणि मुलांचे शिक्षण, असा जोडशब्द नाही दुर्दैवाने अजून!) याच्या कायम चिंतेत राहणे, भाऊबंदकीस तोंड देणे, यातनामय जीवन वाट्यास येणे, या सगळ्यांतून बचावलात तर जिवंत राहणे. विशालचे वडील तो सातवीत असताना गेले. विशालला वाटून गेले असेल, जिवंत राहायला पण तुम्ही कुठे जन्मास येता, ते महत्त्वाचे आहे हल्ली! मागे उरले काय? मोठ्या दोन बहिणी. आकाश कोसळलेली आई. तेरा गुंठे जमिनीचा तुकडा. बाप नसण्याचे पोरकेपण. अभाव आणि गरिबी... या संचितावर काय निर्माण करायचे? कसली भरारी घ्यायची? गावाकडे लोक सहज म्हणतात, 'आता जा हाटीलात आणि विसळ कोपबश्या... नाहीतं लागून जा बे गारेजमंधे.. शिकून काय होणारंय?'त्यांच्यापरीनेतसाअगदीचवास्तविकप्रश्न.कारणगावाच्याद्दष्टीनेशिकून पोर बेरोजगार होते. मग ते शेतमजुरी करायलाही लाजते. धड हिकडं ना तिकडं... विशालची आई सावरते हळूहळू. निर्धार होत जातो त्या माऊलीचा. विशालला हिमतीने म्हणते,"अकरावी- बारावीला मरडसगावातून गंगाखेडला जा. या चिखलात तुझ्या जिंदगीचा ढेकूळ फुटू देऊ नको पोरा.. जा हिथून.." विशाल अकरावीसाठी तालुक्याला येतो. तालुक्याचे गाव. नवीन कॉलेज. अकरावी- बारावी सायन्स. सगळं इंग्रजीत. त्वरण, वेग, त्रिज्या, क्षेत्रफळ, जीवशास्त्र, आवर्त सारणी असल्या परिभाषेत शिकलेल्या ग्रामीण भागातल्या मुलांना, एकदम acceleration, velocity, integration, derivatives, aldehydes and ketones, अशी भाषा अंगावर न येईल तर काय? जोखीम नको म्हणून सगळेच बारावीला क्लास लावतात. पण विशालची तेवढी ऐपत नव्हती. बारावी सायन्स संपूर्ण सेल्फ स्टडी. एकट्याने अभ्यास करून फर्स्ट क्लास घेतला.. ताणतणाव, anxiety वगैरेला फाट्यावर मारत! घरच्या परिस्थितीमुळे इंजिनिअर होण्याचा प्रश्नच नव्हता. बारावी सायन्सनंतर विशाल बी.एस्सी.ला गेला.

त्यावेळी त्याची ओळख 'स्नेहवन' संस्थेचे अशोक देशमाने यांच्याशी झाली. देशमाने यांनी स्वतः आयटीतली नोकरी सोडलेली. ध्यास एकच. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवायचे. त्यांच्या पाठीशी उभे राहायचे. ही पोरे शिकली तर पिढी वाचेल. पुढच्या पिढ्या वाचतील. समाजाचे आपण देणे लागतो. ते दिले पाहिजे. बिनशर्त प्रेमाशिवाय दुसरी अनमोल भेट ती कोणती? म्हणून त्यांनी संस्थेचे नाव ठेवले...स्नेहवन. (www.snehwan.in) अशोकसर खंबीरपणे विशालच्या पाठीवर हात ठेवून 'फक्त लढ' म्हणाले. आर्थिक मदत देऊ केली. विशालने 'स्नेहवन'मधील लहान मुलांना शिकवले. स्वतःचा अभ्यास केला. मेहनत घेतली. समतोल ढळू दिला नाही. सोडून देण्याच्या, मागे फिरण्याची साद देणाऱ्या वेळा अनेकदा आल्या. पण विशालचा ध्यास अढळ होता.

विशाल एम.एस्सी. झाला. Organic Chemistry या विषयाची गोडी लावणारे शिक्षक मिळाले. अणू आणि रेणूंच्या रचनांचा नाद लागला. छान मार्क मिळाले. आई गावी काम करत राहिली. मुलींची लग्न पण तिनेच मेहनतीने केली. चिखलाला सुबक आकार देण्याची धडपड करत राहिली. ...आणि आलाच तो एक दिवस. 'याचसाठी केला होता अट्टहास, ' असे म्हणता येणारा. कॅम्पस इंटरव्ह्यू झाले. मुलाखतीत विशालने जीव तोडून उत्तरे दिली. थ्री इडियट्स सिनेमात इंटरव्ह्यूचा सीन आहे. राजू रस्तोगी म्हणतो.. "दोनो टांगे तुडवा के अपने पैरो पे खडा होना सिखा है सर, बडी मुश्किल से आया है ये attitude..!" विशाल काय म्हणेल? हे शहाणपण कमवायला त्याने कोणती किंमत मोजली आहे? स्वतःच्या जन्मदात्याची, आईचे आयुष्यभराचे हाल व आपदांची, बहिणींच्या शिक्षणाची आबाळ झाल्याची...??? अनंत प्रश्न आहेत.

पण ज्याचा शेवट गोड ते सारेच गोड. विशालला हैदराबादला एका मोठ्या कंपनीमध्ये नोकरी लागली आहे. त्याला संशोधन व विकासात (आर अँड डी) काम करायचे आहे. पहिला पगार 'स्नेहवन'ला अर्पण करायचा आहे. आईला साडी घ्यायची आहे. बहिणींना हॉटेलात जेवायला न्यायचे आहे. आपल्यासारख्याच मुलांना सतत मदत करायची आहे. आणखी चार मुले शिक्षणाला लागली तरी आपल्या कष्टाचे चीज झाले, असे त्यास वाटते. आपल्या प्रकाशाने त्याला सभोवतीची काजळी पुसायची आहे. अशोकसरांना तो खूप मानतो. त्यांना मोठा भाऊ प्रसंगी वडिलांच्या जागी पाहतो. ते नसते तर हा प्रवास झाला नसता, ही जाणीव त्याला आहे.

विशालसारख्या मुलांनी या कठीण काळात उभे केलेले आपले करिअर हे रचनात्मक काम आहे आणि संघर्षात्मकदेखील! वर्ग बदल शक्य आहे, हवा आहे प्रामाणिक ध्यास. प्रतिकुलतेस देता येणारे सकारात्मक उत्तर. विवेकानंद ज्यास 'Man making is the only mission', म्हणून गेलेत, ते समग्र समाजाचे असू शकणारे उच्च ध्येय.अनेक विशाल आजही उभे आहेत आपल्यासमोर. "पाठीवरती हात ठेवून, फक्त लढ म्हणा.." इतक्याच आपल्या सहृदय आशीर्वादासाठी! देणार ना त्यांना सक्रिय प्रतिसाद?

# तिळगुळापेक्षाही गोड बातमी

'स्नेहवन'साठी १४ जानेवारी हा दिवस अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा ठरला. संस्थेतील सर्वांत मोठा विद्यार्थी विशाल शिंदे एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) पूर्ण करून हैदराबादला Syngene International Limited या मोठ्या कंपनीत नोकरीला लागला.

परभणी जिल्ह्यातील छोट्याशा गावातून आलेला विशाल हा पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून नोकरी लागलेला संस्थेतील पहिला विद्यार्थी आहे. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे विशालचे शिक्षण थांबण्याच्या वाटेवर असतानाच अशोक देशमाने यांना त्याची माहिती मिळाली आणि त्याच्या पुढच्या



शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी 'स्नेहवन'ने घेतली. विशालच्या यशामुळे संस्थेतील बाळगोपाळांना प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळाली आहे ●




> "तू चाल पुढं, तुला रं गड्या भीती कशाची," असं म्हणत पाठीवर हात ठेवणारं कोणी असेल तर काही करण्याची इच्छाशक्ती दुप्पट होते. माझंही तसंच झालं. गरीब परिस्थिती असतानाही आईने कधी हार मानली नाही आणि आपल्यासाठी धडपड करणारे कोणी समोर असेल तर आपल्यालाही भीती वाटत नाही. ग्रॅज्युएशन करत असताना 'स्नेहवन'शी संपर्क साधला. परिस्थिती सांगितल्यावर अशोककाका म्हणाले, 'तू आता काळजी करू नकोस. फक्त अभ्यासावर लक्ष दे. बाकी मी बघतो.' एम.एस्सी. करून आज मी हैदरबादमधील मोठ्या कंपनीत कार्यरत आहे. मला आज इथपर्यंत पोहोचणे 'स्नेहवन'मुळेच शक्य झाले.
>
> **- विशाल शिंदे**

# रामरंगी रंगले अवघे स्नेहवन

## अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त चार दिवस आनंदोत्सव



***पांच सदी तक सब व्याकुल थे,***
***हम उनके दुःख में आकुल थे,***
***आज उन्हीं प्रभु के प्यारों ने,***
***कैसी अवध सजाई...***
***चलो अब आ रहे रघुराई...।***

२२ जानेवारी हा दिवस केवळ देशातीलच नाही तर जगभरातील हिंदूबांधवांसाठी अभिमानाचा आणि आनंदाचा ठरला. सुमारे पाचशे वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अयोध्येत उभारलेल्या मंदिरात श्री रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. संपूर्ण देशात या निमित्ताने दिवाळी साजरी झाली. अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त स्नेहवनमध्येही चार दिवस आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

### श्रीराम अक्षता कलशाचे पूजन

ता. १९ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता श्रीराम मंदिर पवित्र अक्षता कलश संस्थेत आणण्यात आला. या कलशाचे मुलांनी उत्साहात स्वागत केले. डोळ्यात आनंदाश्रू, मुखात प्रभू श्रीरामाचे नाव, अशी संस्थेतील सर्वांचीच अवस्था झाली होती. दोन दिवस हा कलश संस्थेत होता. सर्व मुलांनी दोनही दिवस कलशाचे पूजन केले. ●

### कामगार बांधवांना स्नेहाचा हात

कलश आगमनाच्या निमित्ताने 'स्नेहवन'मध्ये आणखी एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. 'स्नेहवन'च्या बालगोपाळांनी परिसरातील कामगार बांधवांना स्नेहाचा हात दिला.

संस्थेच्या परिसरात मराठवाडा- खान्देश भागातून आलेल्या ऊसतोड कामगारांची पाले आहेत. तसेच काही कामगार कुटुंबे पत्र्याच्या शेड उभारून राहात आहेत. वाढती थंडी लक्षात घेऊन मुलांनी या सर्व बांधवाना दोनशेपेक्षा जास्त ब्लँकेटचे वाटप करून प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या आनंदोत्सवास सुरुवात केली. यांप्रसंगी सर्वांनी प्रभू श्रीरामांचा जयजयकार केला.

*(गुढी, तोरणे आणि दीपोत्सव पान २ वर)*

स्नेहवन वार्ता
एक आशेचा किरण
फेब्रुवारी २०२४

## भावी अधिकाऱ्यांच्या भेटीचा आगळा अनुभव



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधून (MPSC) निवड झालेल्या २५ भावी अधिकाऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी 'स्नेहवन'ला भेट दिली. यावेळी त्यांच्याबरोबर महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आक्रे, पुणे महापालिकेचे उपायुक्त गणेश सोनुने उपस्थित होते.

एमपीएससीतून निवड झालेल्या या सर्व उमेदवारांचे सध्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे प्रशिक्षण सुरू आहे. हे सर्व जण सहकार क्षेत्रात रुजू होणार आहेत. त्यांनी 'स्नेहवन'च्या कामाबद्दल माहिती घेतली. संस्थेचे काम पाहून ते भारावून गेले.

"ज्या वयात तरुण स्वतःच्या आयुष्याबाबत व्यवस्थित निर्णय घेऊ शकत नाहीत, त्या वयात अशोक देशमाने अतिशय समर्पित वृत्तीने, अनेक अडचणींना तोंड देत वंचित मुलांचे आयुष्य घडवत आहेत. या भेटीतून खूप काही शिकायला मिळाले," अशी भावना त्यांनी व्यक्त केली. भावी अधिकाऱ्यांना भेटण्याचा अनुभव संस्थेतील मुलांसाठीही वेगळा होता.

## बलशाली युवा हृदय संमेलनात उलगडला 'स्नेहवन'चा प्रवास



घारेवाडी- कराड येथील शिवम प्रतिष्ठानच्या वतीने १२ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या बलशाली युवा हृदय संमेलनात 'स्नेहवन'चे संस्थापक अशोक देशमाने यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यात श्री. देशमाने यांनी आयटी इंजिनीअर ते स्नेहवन हा प्रवास उलगडला.

तरुणांच्या मनाची, बुद्धीची आणि विचारांची मशागत करून चारित्र्यसंपन्न पिढी तयार करण्यासाठी अविरत झटणारे श्री. इंद्रजीत देशमुख (काकाजी) यांच्या प्रेरणेने शिवम प्रतिष्ठान गेल्या २३ वर्षांपासून दरवर्षी या संमेलनाचे आयोजन करत आहे. संमेलनाला सुमारे पाच हजार तरुण- तरुणी उपस्थित होते.

## श्रीलंकन विद्यार्थिनीकडून मुलांना इंग्लिशचे धडे

ग्लोबल क्लासरूम या उपक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळ्या देशांतून महाविद्यालयीन विद्यार्थी 'स्नेहवन'मध्ये मुलांना शिकवण्यासाठी येत असतात. या महिन्यात कविशा मादुहारी ही विद्यार्थिनी श्रीलंकेहून आली आहे. ती संस्थेतील मुलांना इंग्लिश शिकवत आहे. सहा आठवडे ती संस्थेच्या कुटुंबाचा भाग होऊन राहणार आहे.

# गुढी, तोरणे आणि दीपोत्सव







प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दिवशी म्हणजे २२ जानेवारीला सकाळपासूनच 'स्नेहवन'मध्ये लगबग सुरू होती. हा दिवस फक्त 'स्नेहवन'च नव्हे तर संपूर्ण देशासाठी अविस्मरणीय ठरणार होता. मुले नेहमीप्रमाणे सकाळी लवकर उठून प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत होती. कोणाची दाराला तोरण बांधण्याची लगबग सुरू होती, तर कोणी फुलांचे हार करण्यात मग्न होते. मुली रांगोळी काढत होत्या, तर मोठी मुले गुढी उभारण्याची तयारी करत होते.

गुढी उभारल्यानंतर सर्वांनी पूजा केली आणि नंतर सर्व मुलांनी प्रोजेक्टरवर अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण पाहिले. प्राणप्रतिष्ठेनंतर 'जय श्रीराम' असा जयजयकार करत जल्लोष केला.

या आनंदोत्सवात मुलांनी परिसरातील कामगार बांधवांनाही सहभागी करून घेतले होते. या कामगारांसाठी संस्थेत भंडारा आयोजित केला होता. सर्वांनी आनंदाने प्रसाद घेतला. आपल्या सुखदुःखात सर्वांना सामावून घेण्याची आपली संस्कृती आहे. तेच संस्कार मुलांवर व्हावेत, या उद्देशाने ब्लँकेट वाटप, भंडारा हे उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

सायंकाळी संस्थेच्या आवारात सर्वत्र दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. रात्री मुलांनी पुरणपोळीच्या मेजवानीचा आस्वाद घेतला.

## सुहृदांच्या भेटी

### अनिकेत आणि समीक्षा आमटे



हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पाचे अनिकेत आमटे आणि समीक्षा आमटे यांनी २१ जानेवारीला 'स्नेहवन'ला भेट दिली. श्रद्धेय बाबा आमटे यांची तिसरी पिढी समाजासाठी झोकून देऊन काम करत आहे. आदरणीय प्रकाश आमटे यांचे कार्य त्यांचे पुत्र अनिकेतदादा आणि स्नुषा समीक्षाताई पुढे नेत आहेत. अतिशय सक्षमपणे आदिवासी मुलांना शिक्षण देण्याचे काम ते करत आहेत. त्यांनी 'स्नेहवन' प्रकल्पाची पाहणी करून माहिती घेतली आणि मार्गदर्शन केले. त्यांच्या भेटीने संपूर्ण 'स्नेहवन'ला आनंद झाला.

### सीमा आणि रमेश लोकरे



अमेरिकेतील 'साइकॉन' या सॉफ्टवेअर कंपनीचे संस्थापक सीमा आणि रमेश लोकरे यांनी भेट देऊन आशीर्वाद दिले. त्यांचे लोकरे फाउंडेशन 'स्नेहवन'च्या पाठीशी उभे आहे.




## आयसरमध्ये शैक्षणिक सहल

स्नेहवनमधील विद्यार्थ्यांची दर तीन महिन्यांनी शैक्षणिक सहल काढली जाते. जानेवारी महिन्यात मुलांनी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेला (IISER) भेट दिली.

सहलीच्या आधी एक दिवस सर्व मुलांना आयसरची माहिती देणारे व्हिडीओ दाखविण्यात आले. त्यामुळे मुलांना संस्थेविषयी प्राथमिक माहिती मिळाली आणि सहलीची उत्सुकता वाढली.

सकाळी नऊ वाजता सर्व जण आयसरमध्ये पोचले. तेथे एका शाळेची सहलही आली होती. तेथील शिक्षकांनी एका हॉलमध्ये सर्वांना बसवून विविध प्रयोग करून दाखवले. लहान लहान प्रयोगातून विज्ञान कसे शिकायचे, हे समजावून सांगितले. त्यांनी मुलांना काही प्रश्नही विचारले. मुलांनीही त्यांना प्रतिसाद देत छान उत्तरे दिली. त्यानंतर मुलांनी संपूर्ण संस्था फिरून बघितली. ते पाहताना पडलेले प्रश्न त्यांनी तेथील शिक्षकांना विचारले. शिक्षकांनीही सोप्या भाषेत त्यांच्या शंकांचे निरसन केले.

# चांदण्यात रंगली देशमाने दांपत्याची मुलाखत

## गोखले इन्स्टिट्यूटच्या ५० विद्यार्थ्यांनी यूट्युब चॅनेलसाठी साधला संवाद



गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँण्ड इकॉनॉमिक्समधील ५० विद्यार्थ्यांच्या अभ्यास गटाने २७ जानेवारीला 'स्नेहवन'ला भेट दिली.

हे विद्यार्थी स्नेहवनपासून जवळच असलेल्या वडगाव घेनंद या गावात अभ्यास दौऱ्यासाठी आले होते. सायंकाळी सहा वाजता ते संस्थेत आले. संस्थेतील मुलांनी त्यांना संपूर्ण प्रकल्प फिरून दाखविला व माहिती दिली. या दरम्यान या विद्यार्थ्यांनी संस्थेतील मुलांबरोबर गप्पा मारल्या.

प्रकल्प पाहिल्यानंतर सर्व जण मैदानात बसले. त्यावेळी गोखले इन्स्टिट्यूटच्या यूट्युब चॅनेलसाठी 'स्नेहवन'चे संस्थापक अशोक देशमाने व अर्चना देशमाने यांची मुलाखत घेण्यात आली. रात्रीच्या चांदण्यात ही मुलाखत सुमारे दीड तास रंगली. संस्थेची सुरवात कशी झाली, कोणत्या अडचणी आल्या, त्याला कसे तोंड दिले, याबद्दल सविस्तर माहिती अशोक देशमाने यांनी दिली.

## आरोग्य शिबिरात नेत्र, दंत तपासणी





स्नेहवनमधील मुलांसाठी दर महिन्याला आरोग्य शिबिर घेतले जाते. जानेवारीमध्ये लायन्स क्लब ऑफ पुणे भोजापुर गोल्ड यांच्या माध्यमातून क्लबचे अध्यक्ष डॉ. शंकर गायकवाड यांच्या पुढाकाराने शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिरात नेत्ररोग, दंतरोग आणि बालरोग या संदर्भात डॉ. पाटील, डॉ. श्रीमती साबळे, डॉ. श्रीमती लोंढे यांनी मुलांची तपासणी केली. संस्थेतील मुलांबरोबरच परिसरातील ऊसतोड कामगारांच्या मुलांचीही आरोग्य तपासणी केली. तपासणीनंतर सर्व मुलांना ब्रश आणि टूथपेस्ट देऊन दात कसे घासायचे, हेही सांगितले आणि दिवसातून दोन वेळा दात घासण्याचा सल्ला दिला.

## सन्मान

### स्वामी विवेकानंद पुरस्कार

विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त दिला जाणारा स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार 'स्नेहवन'ला देण्यात आला. संस्थेच्या वतीने हा पुरस्कार अशोक देशमाने यांच्या मातोश्री सौ. सत्यभामा देशमाने यांनी स्वीकारला.

प्रतिष्ठानतर्फे आयोजित व्याख्यानमालेच्या शेवटच्या दिवशी १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठान (स्पाईन रोड, चिखली) येथे पुरस्कार वितरण सोहळा झाला. यावेळी आमदार महेश लांडगे, एकनाथ पवार, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कशीद, उपनिबंधक नितीन काळे उपस्थित होते.



देशमाने, धर्माधिकारींसह एकबोटे यांना पुरस्कार

विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : शरदनगर (चिखली) येथील स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त दिला जाणारा स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार अशोक देशमाने यांना, भक्त पुंडलिक पुरस्कार सुधीर धर्माधिकारी यांना, जीवनगौरव पुरस्कार डॉ. मिलिंद एकबोटे यांना जाहीर झाला आहे.

प्रतिष्ठान आयोजित व्याख्यानमालेच्या शेवटच्या दिवशी दि. १२ जानेवारीला सायंकाळी सातला स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठान, स्पाईन रोड, चिखली या ठिकाणी हा सोहळा होईल. यावेळी आमदार महेश लांडगे, एकनाथ पवार, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कशीद, उपनिबंधक नितीन काळे उपस्थित राहणार असल्याची माहिती संतोष ठाकूर यांनी दिली. आयोजनासाठी सुनील पंडित, मिलिंद वेल्हाळ, महेश मांडवकर, शंकरराव बनकर, पंढरीनाथ म्हस्के, सुनील खंडाळकर, देवराम मेदनकर, दिलीप मांडवकर यांनी पुढाकार घेतला.

या तीन मान्यवरांना मिळाला जीवनगौरव पुरस्कार

अशोक देशमाने

डॉ. मिलिंद एकबोटे सुधीर धर्माधिकारी

### शहाणे मास्तर यांच्या स्मरणार्थ विशेष सेवा पुरस्कार




कामगार, कष्टकऱ्यांच्या प्रगतीसाठी झटणारे श्री. शहाणे मास्तर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा 'विशेष सेवा पुरस्कार' यावर्षी स्नेहवन संस्थेला देण्यात आला. श्री. शहाणे मास्तर यांच्या आठव्या स्मृतिदिनी २४ जानेवारीला संगमनेर येथील मालपाणी इंडस्ट्रियल पार्क येथे पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला.

**मालपाणी समुहातर्फे गौरव**

याच कार्यक्रमात मालपाणी समुहातर्फेही स्नेहवनचा सन्मान करण्यात आला. तसेच ५१ हजार रुपयांचा धनादेश समुहाच्या वतीने देण्यात आला. शहाणे मास्तर प्रतिष्ठानचे पदाधिकारी, डॉ. सुधीर तांबे, मालपाणी समुहाचे अध्यक्ष राजेश मालपाणी आणि सर्व कामगार बांधव यावेळी उपस्थित होते.

## संक्रांतीनिमित्त लुटली पतंग उडविण्याची मजा

स्नेहवनमध्ये मकर संक्रात सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. संक्रांतीच्या आदल्या दिवशी १४ जानेवारीला भोगीनिमित्त बारा मिसळीची भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी असा जेवणाचा बेत होता.

संक्रातीच्या दिवशी मुलांनी स्वतः कागदी पतंग तयार केले. सर्वांनी एकत्र पतंग उडवत सण साजरा केला. रात्री पुरणपोळीच्या जेवणाचा आस्वाद मुलांनी घेतला.

